**महाराष्ट्र जनशक्ती** | **ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २७१ वे | दिनांक : २७/०९/२०२६ | वार : रविवार

## 'जीआर आधी नीट वाचा, दुष्काळाचे राजकारण बंद करा!': बावनकुळे-दरेकरांचा विरोधकांना थेट इशारा



**मुंबई :** पावसाच्या मोठ्या खंडाने आणि अल निनोच्या प्रभावामुळे खरीप हंगाम पूर्णपणे धोक्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने मोठा व दिलासादायक निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने राज्यातील 358 पैकी तब्बल 265 तालुक्यांमध्ये अधिकृतरीत्या कोरडा दुष्काळ जाहीर केला आहे. यावर आता विरोधकांनी टीका करण्यास सुरुवात केली आहे. दुष्काळ जाहीर केला, मात्र अंमलबजावणी कधी होणार, असा सवाल उपस्थित करण्यात येत आहे. यावर भाजप नेते प्रवीण दरेकर तसेच महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रत्युत्तर दिले आहे. आमदार प्रवीण दरेकर म्हणाले, मुख्यमंत्री कर्तव्य भावनेतून काम करत असतात. निश्चितच स्वागतार्ह आणि अभिनंदनीय अशा पप्रकारचा तात्काळ शीघ्र गतीने घेतलेला हा निर्णय आहे. आता निर्णय झाल्यावर पण काहीच आपल्याला राजकारण करायला मिळत नाही. अंमलबजावणी कधी करणार असे विरोधक म्हणत आहेत. माझे आपल्या माध्यमातून नम्र आवाहन आहे की तो जीआर नीट वाचा. जीआरमध्ये काय लिहिले आहे ते पाहा, बघायचे नाही काही नाही आणि आपला अजेंडा त्या ठिकाणी थोपवून द्यायचा, यापलीकडे विरोधी पक्ष काही करत नाही, अशी टीका दरेकर यांनी केली आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी देखील विरोधकांच्या टीकेला प्रत्युत्तर दिले आहे. ते म्हणाले, कर्नाटक राज्याचे नाव ते घेतात, काय केले कर्नाटक राज्याने? बोगसपणा केला. काही दिले नाही शेतकऱ्यांना. सांगा बरं कुठला निर्णय घेतला आहे कर्नाटक सरकारने? खोटारडेपणा आहे हा. माझी विनंती आहे सर्व विरोधी पक्षांच्या नेत्यांना दुष्काळाचे राजकारण करू नका. मी तुमचं म्हणणं ऐकून घ्यायला तयार आहे. मी कॅबिनेट सब-कमिटीला वेळ द्यायला तयार आहे. विरोधकांना माझ्या कॅबिनेट सब-कमिटीमध्ये सुद्धा निमंत्रण देईल. त्यांना वाटतं तर त्यांनी संध्याकाळी 5 वाजता मला निवेदन देऊन यावं. किंवा एक मेसेज करून यावं. मला फार काही प्रोटोकॉलची गरज पडत नाही. पुढे बोलताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, मी विरोधी पक्षाच्या सर्व नेत्यांना, पक्षांच्या अध्यक्षांना विनंती करतो आहे की तुम्ही राज्यात नाकारात्मकता निर्माण करू नका. सकारात्मक पद्धतीने आपल्याला हा दुष्काळ हाताळावा लागेल. चर्चा न करता वायफळपणे बोलून नुसतं जनतेच्या मनात संभ्रम तयार करण्याचं काम करू नका.

## कोरडा दुष्काळ जाहीर; शेतकऱ्यांना कधी मिळणार मदत?

**मुंबई :** पावसाच्या मोठ्या खंडाने आणि खरिपाच्या पिकांचे झालेले अतोनात नुकसान पाहता राज्य सरकारने राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती असल्याचे अधिकृतरीत्या जाहीर केले आहे. कृषी आयुक्तांच्या अहवालानुसार या सर्व बाधित तालुक्यांमध्ये दुष्काळाचा 'ट्रिगर-१' (प्रथम कळ) लागू करण्यात आला असून, शासनाने शेतकऱ्यांसाठी १२ प्रमुख सवलतींची घोषणा केली आहे. मात्र, शेतकऱ्यांना पिकांच्या नुकसानीपोटी नेमकी किती आर्थिक मदत मिळणार, हे अद्याप निश्चित झालेले नाही. दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ नुसार, राज्यातील पावसाची तूट आणि इतर नैसर्गिक घटकांच्या प्रभावाचे मूल्यांकन करून दुष्काळी परिस्थिती जाहीर केली जाते. जेव्हा एखाद्या भागात पावसाळा सुरू झाल्यापासून सलग पर्जन्यमानाची मोठी तूट दिसून येते आणि पिके धोक्यात येतात, तेव्हा प्रशासकीय स्तरावर दुष्काळाची 'पहिली कळ' म्हणजेच 'ट्रिगर-१' (Trigger-1) लागू झाल्याचे मानले जाते. हा ट्रिगर लागू होणे याचा अर्थ असा की, त्या भागात अधिकृतरीत्या दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून, आता शासनाने तातडीने नुकसानीचे सर्वेक्षण (पंचनामे) आणि प्राथमिक सवलती सुरू करणे बंधनकारक असते. राज्य सरकारने १२ सवलती (उदा. कर्जवसुलीला स्थगिती, महसुलात सूट, परीक्षा शुल्क माफी इत्यादी) तत्काळ लागू केल्या असल्या तरी, शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होणाऱ्या थेट आर्थिक मदतीचा (नुकसानभरपाईचा) आकडा या शासन निर्णयात जाहीर केलेला नाही.

## SIR वादावर महाजनांचा राज ठाकरेंसह विरोधकांवर पलटवार



**नाशिक :** मतदार यादीच्या विशेष सघन पुनरीक्षण (SIR) प्रक्रियेवरून आणि केंद्रीय निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवरून देशभरात राजकीय वादंग पेटले असताना, राज्य सरकारमधील संकटमोचक मानले जाणारे मंत्री गिरीश महाजन यांनी विरोधकांवर जोरदार प्रतिहल्ला चढवला आहे. "एसआयआरच्या माध्यमातून मतदार याद्यांमधील केवळ दुबार आणि बोगस नावे वगळली जात आहेत. विरोधकांकडे कोणताही जनाधार उरलेला नसल्याने ते निवडणूक आयोगावर खापर फोडत आहेत. बोगस मतांच्या आधारे निवडणूक जिंकण्याचे स्वप्न पाहणाऱ्या विरोधकांची अवस्था सध्या 'नाचता येईना, अंगण वाकडे' अशी झाली आहे," असा सडकून टोला महाजन यांनी लगावला. यावेळी त्यांनी मनसे प्रमुख राज ठाकरे, काँग्रेस, ठाकरे गट आणि शरद पवार यांच्या पक्षावर निशाणा साधतानाच, आमदार बच्चू कडू यांचे दावे, मंत्रिमंडळ विस्तार आणि राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर सविस्तर भाष्य केले. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यशैलीवर आक्षेप घेत विरोधक राजीनाम्याची मागणी करत असल्याच्या पार्श्वभूमीवर महाजन म्हणाले, "राज ठाकरे यांच्या विधानांवर आता काय बोलावे, हेच मला समजत नाही. एसआयआरमुळे मतदार यादी स्वच्छ होत असून डुप्लिकेट नावे कमी केली जात आहेत. जर कोणाचे नाव चुकून वगळले गेले असेल, तर त्यांना आजही नाव नोंदवण्याची आणि फॉर्म भरण्याची पूर्ण संधी आयोगाने दिली आहे. असे असताना विरोधक नेमक्या कोणत्या आधारावर आक्षेप घेत आहेत?“ शिवसेना आमदार बच्चू कडू यांनी दिवाळीत मंत्रिमंडळात मोठा खांदेपालट होणार असल्याचा आणि महागाईवर केलेल्या विधानाचा महाजन यांनी चांगलाच समाचार घेतला. "दिवाळीनंतर मंत्रिमंडळात खांदेपालट होणार आहे की नाही, हे बच्चू कडू यांनाच जास्त ठाऊक असेल. मला तरी सध्यातरी अशा कोणत्याही बदलाची अजिबात माहिती नाही," असा टोला त्यांनी लगावला. "बियाणे, डिझेल महाग झाले पण शेतमालाला भाव नाही, असे वक्तव्य बच्चू कडू करतात. त्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की ते स्वतः सत्ताधारी महायुतीचा भाग आहेत. सत्तेत राहून अशा प्रतिक्रिया देणे योग्य नाही. त्यांना शेतकऱ्यांचे प्रश्न मांडायचे असतील, तर त्यांनी थेट सरकारसमोर आणि मुख्यमंत्र्यांसमोर मांडावेत. आपण विरोधी पक्षात असल्यासारखे वागणे बंद करावे.“ पाचोराचे आमदार किशोर पाटील यांना मंत्रिपद देण्याच्या मागणीवर बोलताना ते म्हणाले, "किशोर आप्पांना मंत्रिमंडळात घ्यायचे की नाही, हा पूर्णपणे त्यांच्या पक्षाचा (शिवसेना शिंदे गट) अंतर्गत विषय आहे. याबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेच अंतिम निर्णय घेतील.“ राज्यातील पावसाच्या तुटीवर आणि निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीवर दिलासा देताना गिरीश महाजन यांनी स्पष्ट केले. “यंदा पावसाने सुरुवातीला महिनाभर दडी मारली आणि पेरण्या झाल्यानंतरही मोठा खंड पडला. त्यामुळे खरीप पिके उद्ध्वस्त झाली असून पिण्याच्या पाण्याचा आणि जनावरांच्या चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. मात्र, बळीराजाने अजिबात चिंता करू नये, शासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे.” दुष्काळाचे पंचनामे करण्यासाठी महसूल आणि कृषी यंत्रणा शेताच्या बांधावर उतरली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २७ सप्टेंबर २०२६


## कामक्षा देवी उच्च माध्यमिक विद्यालयाचा ओमकार काकड ज्यूडो स्पर्धेत विभागीय स्तरावर



**किनगाव राजा (महेश मुंढे) :** कामक्षा देवी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय किनगांव राजा या शाळेचा विद्यार्थी ओमकार सुनील काकड यांने जिल्हा स्तरावर झालेल्या ज्यूडो स्पर्धेत ५० किलो वजन खालील गटांमध्ये प्रथम येवून विभागासाठी पात्र ठरला आहे. महाराष्ट्र राज्य क्रीडा संचलनालय पुणे यांच्या मार्फत आयोजीत बुलढाणा जिल्हा क्रीडा संकुल येथे जिल्हा स्तरीय ज्युडो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.ज्युडो स्पर्धेमध्ये जिल्ह्यातील अनेक शाळेतील विद्यार्थी सहभागी झाले होते.ज्युडो स्पर्धेमध्ये झालेल्या अंतिम सामना लायन्स ज्ञानपीठ खामगांव या शाळेच्या विद्यार्थ्यासोबत झाला,या चुरशीच्या सामन्यांमध्ये ओमकार काकड याने बाजी मारली.यावेळी क्रीडा शिक्षक नितीन खरात,क्रीडा प्रशिक्षक सुनील काकड,दत्तात्रय पवार,राजू चंदवडे, अफरोज पठाण, गजानन काळुसे आदी उपस्थित होते.शाळेचे अध्यक्ष शिवाजीराव काळुसे प्राचार्य उद्धव दराडे यांच्यासह शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन व शुभेच्छा दिल्या आहेत.

## जिल्ह्यात 'सेवा संकल्प अभियान' जोरात; महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी कृषी विभागाचे नवे पाऊल

**बीड (भगवंत पाळवदे) :** सामान्य नागरिकांपर्यंत शासकीय योजनांचा लाभ पारदर्शक पद्धतीने पोहोचवण्यासाठी आणि प्रशासकीय सेवा अधिक गतिमान करण्यासाठी बीड जिल्ह्यात सध्या 'सेवा संकल्प अभियान' अत्यंत प्रभावीपणे राबवले जात आहे. या अभियानांतर्गत आता महिला शेतकऱ्यांना थेट विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी कृषी विभागाने महत्त्वपूर्ण पहल केली असून, महिलांना 'महिला शेतकरी प्रमाणपत्र' (Mahila Shetkari Pramanpatra) घरबसल्या उपलब्ध करून देण्याची ऑनलाईन मोहीम सुरू करण्यात आली आहे.जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय, बीड यांच्या वतीने 'सेवा संकल्प अभियान'च्या पार्श्वभूमीवर ही विशेष मोहीम हाती घेण्यात आली असून, यामुळे शेतकरी महिलांना मोठा दिलासा मिळणार आहे.'सेवा संकल्प अभियान'चा उद्देश आणि महिला सक्षमीकरणशासनाच्या धोरणांनुसार प्रत्येक घटकापर्यंत योजना पोहोचवण्याचा संकल्प सोडत बीड जिल्ह्यात 'सेवा संकल्प अभियान' राबवले जात आहे. शेतीमध्ये राबणाऱ्या महिलांना हक्काचे स्थान मिळवून देणे आणि त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. या प्रमाणपत्राच्या माध्यमातून महिला शेतकऱ्यांना कागदपत्रांची पायपीट करावी लागणार नसून, ही प्रशासकीय सेवा आता त्यांच्या दारी किंवा थेट मोबाईलवर उपलब्ध झाली आहे.अशी आहे ऑनलाईन अर्ज करण्याची सोपी प्रक्रिया'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत प्रक्रिया पूर्णपणे डिजिटल आणि सुलभ करण्यात आली आहे. * महिला शेतकऱ्यांनी https://uat-mahakrishi.mahaitgov.in/mahila-shetkari-service या लिंकचा वापर करून ऑनलाईन अर्ज करावा. * तसेच, प्रसिद्ध करण्यात आलेल्या QR कोड द्वारे मोबाईलवरून थेट अर्ज सादर करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.कृषी विभागाचे आवाहन'सेवा संकल्प अभियान' हे केवळ एक प्रशासकीय उपक्रम नसून तो ग्रामीण भागातील परिवर्तनाचा एक महायज्ञ आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त महिला शेतकऱ्यांनी या डिजिटल प्रक्रियेचा लाभ घेऊन आपले 'महिला शेतकरी प्रमाणपत्र' काढून घ्यावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, बीड यांच्यामार्फत करण्यात आले आह

## बलसूर येथे तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार



**बलसूर (प्रा.नागसेन कांबळे) :** उमरगा तालुक्यातील बलसूर येथील श्री. छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शनिवारी (ता.२६) मैदानी स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य सतीश वाकडे होते. यावेळी क्रीडाशिक्षक दत्तात्रय जाधव, प्रा. बी. टी. जाधव, प्रा.परमेश्वर सूर्यवंशी , संजय गायकवाड, जे.डी.बुवा आदींची उपस्थिती होती. (एकुरगा ता.उमरगा) येथे झालेल्या मैदानी स्पर्धेतील साहिल चव्हाण, सिद्धेश्वर बनसोडे, आरती हिंगमिरे, तनुजा रणखांब, गायत्री जाधव, प्रेरणा चव्हाण, समर्थ पुजारी, सुंदर सुरवसे , सिद्धेश्वर बनसोडे, अतिशय वाघमोडे, आर्यन इंगळे, बाबुराव कोळी आदीसह मार्गदर्शक शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. प्राचार्य सतीश वाकडे, संजय गायकवाड, दत्तात्रय जाधव आदींची भाषणे झाली. कार्यक्रमासाठी सुनिता साळुंके, जुगल चव्हाण, प्रा. मधुमती पाटील , अविनाश सुरवसे, परमेश्वर नागरगोजे, सतीश कांबळे, नागनाथ तेलंग, सुमित कदम, प्रा. सचिन चव्हाण, प्रा.वामन भोरे, प्रा. अक्षय जाधव, के .डी. कांबळे, अब्दुल अत्तार, निलेश सूर्यवंशी, मधुकर सरवदे, पवन घोडके, राजुदास चव्हाण, अजिंक्य काळे, हणमंत बाळेकर, प्रज्ञा राठोड आदींनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. पी .बी .सूर्यवंशी यांनी तर आभार प्रा .पी .आर .कांबळे यांनी मानले.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## राज्यातील शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही - उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार



**मुंबई/बीड (भगवंत पाळवदे) :** खरीप २०२६ हंगामातील पर्जन्यमानातील तूट आणि अन्य दुष्काळी निकषांच्या आधारे राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये ट्रिगर-१ (प्रथम कळ) लागू झाल्याने या तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहिर करून विविध उपाययोजना व सवलती लागू करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. मदत व पुनर्वसन विभागाच्या वतीने यासंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला असल्याची माहिती उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिली.उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार पुढे म्हणतात की, राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकरी आणि ग्रामीण भागातील नागरिकांना शासन वाऱ्यावर सोडणार नाही. अडचणीच्या काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन ठामपणे उभे आहे. खरीप हंगामातील परिस्थिती लक्षात घेऊन राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी उपाययोजना लागू करण्याचा निर्णय शेतकरी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला दिलासा देणारा आहे.दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ नुसार करण्यात आलेल्या मूल्यांकनाच्या आधारे राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये ट्रिगर-१ (प्रथम कळ) लागू झाल्याचे कृषी आयुक्तांच्या अहवालातून स्पष्ट झाले आहे. त्यानुसार संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना पंचनाम्याची कार्यवाही तातडीने सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सर्वेक्षण केलेल्या क्षेत्रातील पिकांची स्थिती दर्शविणारे छायाचित्र आणि जीपीएस कोऑर्डिनेट्स संकलित करून पिकांच्या परिस्थितीचा अहवाल कृषी आयुक्तांमार्फत शासनाला सादर करण्यात येणार आहे.दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये जमीन महसुलात सूट, पिक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती, कृषी पंपाच्या चालू वीजबिलात सूट, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी अशा विविध सवलती लागू करण्यात आल्या आहेत. तसेच रोजगार हमी योजनेअंतर्गत कामांचे निकष शिथिल करून जास्तीत जास्त कामे सुरू करणे, आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे, टंचाई जाहिर केलेल्या गावांमध्ये शेतीपंपांची वीज जोडणी खंडित न करणे, शेतकरी व शेतमजुरांना अन्नधान्याची उपलब्धता सुनिश्चित करणे आणि जनावरांसाठी आवश्यक चारा उपलब्ध करून देणे यांसारख्या उपाययोजनाही करण्यात येणार आहेत.याशिवाय जलसंधारणाची कामे सुरू करणे तसेच पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या पाण्याचे नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतपिकांच्या नुकसानीबाबतची मदत विहित कार्यपद्धती पूर्ण केल्यानंतर स्वतंत्र शासन निर्णयाद्वारे जाहिर करण्यात येणार आहे.या निर्णयाचा लाभ बीड, लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी, हिंगोली, बुलढाणा, अमरावती, अकोला, वाशिम, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार, अहिल्यानगर, पुणे, सोलापूर, सांगली, सातारा, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांतील एकूण २६५ तालुक्यांना होणार आहे.दुष्काळाच्या परिस्थितीत शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण भागातील कुटुंबांना आवश्यक ती मदत वेळेत मिळावी, हा शासनाचा प्रयत्न आहे. पंचनामे, पिकांची वस्तुनिष्ठ पाहणी आणि पुढील मदतीची कार्यवाही गतीने करण्यात येईल. शेतकऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत वाऱ्यावर सोडले जाणार नाही, असा विश्वास उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी व्यक्त केला.उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी या निर्णयासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच मदत व पुनर्वसन विभागाचे आभार मानले असून, दुष्काळग्रस्त भागातील परिस्थितीवर शासन सातत्याने लक्ष ठेवून असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २७ सप्टेंबर २०२६


## तालुकास्तरीय सॉफ्टबॉल स्पर्धेमध्ये जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळा उंबरखेडा चे वर्चस्व




**कन्नड :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व कन्नड तालुका क्रीडा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय सॉफ्टबॉल स्पर्धा शिवाजी महाविद्यालय कन्नड च्या मैदानावर आयोजित करण्यात आली होती .या स्पर्धेमध्ये प्राथमिक व माध्यमिक शाळा उंबरखेडा शाळेने निर्विवाद वर्चस्व स्थापित केले. १७ वर्षाखालील वयोगटांमध्ये प्रथम क्रमांकाने प्राथमिक शाळा उंबरखेड येथील मुलींचा संघ विजयी झाला. द्वितीय क्रमांकावर मुलींचा संघ देवगिरी इंग्लिश स्कूल कन्नड विजय ठरला. १७ वर्ष वयोगटातील मुले प्रथम क्रमांकावर कर्मवीर काकासाहेब देशमुख विद्यालय कन्नड तसेच द्वितीय क्रमांकावर जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळा उंबरखेडा विजय ठरले.19 वर्षाखालील गटामध्ये प्रथम क्रमांक मुली जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळा उंबरखेडा द्वितीय क्रमांकावर डॉ.भीमराव आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालय कन्नड 14 वर्षे वयोगटांमध्ये मुले प्रथम क्रमांक कर्मवीर काकासाहेब देशमुख विद्यालय कन्नड तसेच द्वितीय क्रमांकावर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उंबरखेडा विजय ठरला .14 वर्षे खालील वयोगट मुली प्रथम क्रमांक वर देवगिरी इंग्लिश स्कूल तसेच द्वितीय क्रमांक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उंबरखेडा विजय ठरले.जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळा उंबरखेडा येथील सर्व खेळाडूंना प्रवीण शिंदे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. तालुकास्तरीय स्पर्धेसाठी तालुका क्रीडा संयोजक मुक्तानंद गोस्वामी, क्रीडा मार्गदर्शक अविनाश काळे, राहुल दनके, करण राठोड आदी मान्यवर उपस्थित होते. कन्नड पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी मनिष दिवेकर, वरिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी प्रदीप पवार, केंद्रप्रमुख राहुल इंगोले,शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष अंकुश बाबु राठोड उपाध्यक्ष सचिन जाधव तसेच सर्व सदस्यांनी तसेच शाळेचे मुख्याध्यापक प्रवीण थोरात,अतुल दसोडे, सुरज जाधव, उमेश हुकुमदार, विशाल महाजन, पांडुरंग सुपेकर, मनोज रायसिंगे फुरकान शेख ,लक्ष्मण गझलवाड , क्रीडाशिक्षक धनंजय अहिरे, प्रवीण राठोड ,अंकुश राठोड या सर्वांनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन केले.

## किनगाव राजा येथील महावितरण कार्यालयात निवेदन; तांत्रिक कर्मचारी प्रशांत देशमुख यांच्या बदलीची मागणी



**किनगाव राजा (महेश मुंढे) :** महेश मुंढे किनगाव राजा येथील वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा तातडीने सुरळीत करावा, तसेच वीज ग्राहकांशी उद्धटपणे वागणाऱ्या वीज वितरण कंपनीच्या तांत्रिक कर्मचाऱ्यांवर योग्य ती कारवाई करावी, दि. 24/09/2026 ला रात्री 10 वाजता ग्रामस्थ, मा. सरपंच महावितरण कार्यालयात येऊन अशी मागणी करण्यात आली आहे.याबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (महावितरण), शाखा किनगाव राजा, ता. सिंदखेड राजा, जि. बुलढाणा येथील कनिष्ठ अभियंता माघाडे यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात तांत्रिक कर्मचारी प्रशांत देशमुख यांच्या कथित बेजबाबदारपणाबाबत आणि ग्राहकांशी होणाऱ्या उद्धट वागणुकीबाबत नाराजी व्यक्त करण्यात आली आहे.वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिक, व्यापारी तसेच सर्वसामान्य वीज ग्राहकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी तक्रारी करूनही अपेक्षित कार्यवाही होत नसल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे.वीजपुरवठा ही नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित अत्यावश्यक सेवा असताना त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या कार्यपद्धतीची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गांभीर्याने दखल घ्यावी, अशी मागणी निवेदनकर्त्यांनी केली आहे. तसेच तांत्रिक कर्मचारी प्रशांत देशमुख यांच्या कामकाजाची चौकशी करून दोष आढळल्यास शिस्तभंगाची कारवाई करावी किंवा त्यांची अन्यत्र बदली करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.वीजपुरवठ्याचा प्रश्न तातडीने मार्गी न लागल्यास नागरिकांच्या वतीने महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे दाद मागण्याचा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

## संकट अस्मानी

आता पावसाविना शेतात,<br>पीक करपून चालले सारे.<br>मेघाराजा कुठे लपून बसला?<br>वाहू लागले रे कोरडे वारे. १

दुष्काळाच्या जाळ्यात,<br>माझा बळीराजा अडकला.<br>अचानक संकट अस्मानी,<br>शेत-शिवारावर धडकला. २

करपलेले शेत पाहताच,<br>हृदय तीळतीळ तुटतोय.<br>दु:ख सहन करता करता,<br>मनाचे संयम आता सुटतोय. ३

मेघराजाच्या अवकृपेने,<br>शेतकऱ्यांचे झाले हाल.<br>पीक शेतात करपून जाता,<br>उभ्यानेच जळाला माल. ४

मनी पाहिलेले स्वप्न सारे,<br>भर दिवसाच लुटून नेले.<br>दु:ख त्याचे कोणास सांगू,<br>हातातले सारे करपून गेले. ५

आले दुष्काळाचे दिवस,<br>बळीराजास मदत करू.<br>दु:ख त्याचे समजून घेऊन,<br>चला मदत करून हाती धरू. ६



**नागेश बोंतेवाड,<br>छत्रपती संभाजीनगर**


प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र


संपर्क

9405109103




महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २७ सप्टेंबर २०२६

# हाटूमुटूचा चंद्र - बालमनाची अनोखी शिदोरी




बाल साहित्यांत मोलाचे अनमोल साहित्य निर्माण करणारे एक मनस्वी अध्यापक फारूख एस काझी गुरूजी यांचा 'हाटुमुटूचा चंद्र' हा बालकथेचा बालेकिल्ला आहे.दाटुमुटीचा चंद्र,खोटाखोटा चांदमामू ही बालमनाची एक अनोखी शिदोरी आहे.आजीच्या गुजगोडगोष्टीतून,बोध संस्कारातून पुर्वी नातवंडे वाचकानुबंध व्हायचे.आज असेच अनेकात एक फारूख काझी सर आहेत.बालसाहित्यात त्यांनी अनेक पुस्तके लिहिली.ज्ञान तंत्रज्ञान कसे विकसित झाले.मुलं दुसऱ्या ग्रहावर जाऊन राहण्याची इच्छा व्यक्त करु लागले.तिथले सुंदर निसर्गसंगत जगणे खाली कुणाला सांगू नका प्रस्तूत अफलातून कथा आहे.'एसपी.१३'म्हणजे बाल समयारा अंतराळात जाऊन तिथल्या जीवन सृष्टीचा ती अभ्यास करून येणाऱ्या आपल्या भारतीय पिढीला आपण ही यांच्यासारखे निसर्गप्रेमी होऊ.पण मामा तू इथली काहीच माहिती सांगू नको नाहीतर आपली लोक इथे येईन धिंगाणा घालतील, नासधूस करतील.या शांत सृष्टीचा विनाश करतील.असे ती माझ्याकडून वचन घेते.अशी सूंदर अफलातून कथा एक नवा संदेश देऊन जाते.'फिकर नाॅट' काळजी करू नकोस!रेहान व अर्पित एक उंच पठारावर जातात.या दोन मित्रांनी मिळून फक्त निसर्गाचा आनंद घेतला.एका खडकावर बसून माऊथ ऑर्गन वाजवून पक्षांना आनंद दिला.तर एक सुंदर दरीत थंडगार हावेचा गारवा घेतला.ओढ्याच्या पाण्याचा पाय सोडून बसल्यावर माशांच्या पिलांनी पायाला गुदगुल्या केल्या.बाटलीत भरलेले मासे पोहताना अस्वस्थ झाले हे अर्पितने पाहिले.खरतरं निसर्ग आपणास सुख आणि आनंद देण्यासाठी असतो.अर्पित या शुद्ध मोकळ्या हावेत दीर्घ श्वास घेऊन शुद्ध हवा हृदयात भरुन घेतो.या बालकथेत "आपण फक्त आनंद भरून घेऊ शकतो."माझी आजी म्हणते "आपण सगळंच घेयाला बघतो.देतं काहीच नाही.करु नये असं.आपण आनंद भरून घ्यावा,मनात.म्हणजे माणूस परत परत अनुभव घ्यायला इथे येतो.नाहीतर त्याची आठवण कायम ठेवतो"(पृ.२२)ही अतिशय सुंदर आशय देऊन जाणारी कथा.नाहीतर आज निसर्गाचा ओरबाडून काढणे चालू आहे हे थांबले पाहिजे.'करके देखो!'..ओजस व रेहान या मुलांनी टेकडीवरचा कचरा गोळा करण्याचे ठरविले.यात उनाड गँग व करके देखो टीम.मुलं स्वच्छतेची कामे करतात पण याची दखल व्हाट्सअप घ्या माध्यमातून ती सर्वव्यापी होते.मुलांचे चांगल्या कामाचे कौतुक होते.बालमनावर फक्त करके देखो!ही नवं चैतन्यता मिळावी.कौतूकाची धाप आपोआपच मिळते.हा मनस्वी संदेश ही बालकथा देऊन जाते.'जखम' ही एक बालपणीच्या मनाची आठवण जखम ही हिरवी होऊन येते.आपली शाळा,आपली आवडती झाडे,आपल्या गोट्याखेळण्याच्या जागा.आपल्या चिंचेच्या फांद्या.त्या चिंचेवरची माकडं.कुणीतरी दगड मारून माकडं जखमी केले.त्या माकडाने पोराच्या तोंडात मारून त्याला ही जखमी केले.ही माकडं या चिंचेवरून काढून दिली पाहिजे म्हणून फटाके,तोटे वाजवून त्यांना एका पिलाला जखमी केले.त्याची आई माकडीन त्याला वाचतांना त्या तोट्याने तिचा डोळा फुटला.ती तीचं पिलाला पोटाला घेऊन पळाली.फिरून गावात चिंचेवर शाळेतल्या हौदावर पाणी पियाला माकड कधीचं आले नाही.आज ती चिंच फांद्या तुटल्या पण एक आठवण अशी "आई तुला आठवते का गं ती माकडीन?"व्हय,पन मिली बिचारी.डोळा फुटला होता तिचा.पोराचा खेळ झाला आन तिचा मातर जीव गेला."आई..तो...तोटा मी...मी..मीच फेकला होता!"असा बोलून मी ओक्साबोक्शी रडू लागलो"(पृ.३३)या कथेतील बालनायक गाव,शाळा,चिंच माकडीनं यांची दुःखद कथा सांगून जातो.बालपणीचा काळ ही किती संवेदनशील असतो.तिच आपली खरी सुख दुःखाची शिदोरी असते.जी जीवनभर उरवून पुरवून चोखून माखून अनुभवायची असते.'जाऊ दे त्याला 'या कथेतील निधी एका फाॅरेस्ट अधिकाऱ्यांची मुलगी.हे कुटुंब बदली होऊन ऐका फाॅरेस्ट बंगल्यात राहायला येतात.खूप दिवसांपासून हा बंगला बंद आहे.मग जंगलातले बिबटे,वाघ कोल्हे आणि अस्वल.पण निधीला इथे एक डायरी सापडते.त्या डायरीत काही अफलातून गोष्टी लिहिल्या होत्या.पुर्वी राहत असलेले अफोरज शेख साहेबांची मुलगी इथे परत येईल (पृ.४०)जंगली प्राण्यांना माणसाचा लळा लागतो.रोज रात्री दरवाजावर नखे ओढणारा अस्वल शबताब.आपूलकी हवी असते.इथे शबताब अस्वल निधीला पाहून निघून जातो.इथे आपले कुणीच नाही ही अनभिज्ञ अनामिक ओढ या सृजनशील बालकथेचा एक हळवा कोपरा देऊन जाणारी कथा.'बाबांची भाषा' इयत्ता सहावीतला सारंग त्याचे बाबा अपघात झाल्यामुळे दवाखान्यात आई सी यु मध्ये होते.डॉक्टरांनी सांगितले त्यांना ऐकू व बोलत येणारं नाही.ही दुःखद बातमी सारंग सुखद करतो तो मोबाईलवर हातवरची म्हणजे करपलवीची भाषा ही माझ्या बाबांची भाषा असेल मी त्यांना आनंद देईल.इथे जीव वाचला.पण सारंग बाळाने बाबांची भाषा निर्माण केली असा बोध ही कथा देऊन जाते.'मैतर' ही ग्रामीण विश्वची अतिशय नितळ निर्लेप निस्पृह श्रद्धेय प्रेमळ मनाची कथा आहे.अमृत हा सहावीत शिकणारा मुलगा आपल्या शेतावर मेंढक्या आजोबांनी लावलेली नातवागत माया.पाऊसकळा संपला तसा तो मेंढक्या जायला निघतो."काका,माझी आटवण ठेवा,पुडच्या वर्षी इथंच या मी वाट बघतो."अमृत रडवेला झाला होता (पृ.५२) त्या काकाला अमृत कानटोपी देतो.तर मेंढ्यका काका अमृतला टीशर्ट देतो.मेंढक्या काका जीजीच्या पाया पडून निघतो.ही कथा तत्कालीन बनगरवाडीची आठवण करून देते.मैतर हा कसा जीव जिव्हाळ्याचा होऊन जातो.'स्वप्न' सायकल कोनाड्यात ठेवाण्यासाठी नसते.तीच साफसफाई करणे.तिला ही जीव असतो तिला ही भाव भावना असतात."राजू,ही सायकल तुझ्या मुलाला घेऊन जा.काही दुरुस्ती असेल तर करून घे.खर्च मी देईन"(पृ.५९) राजू सायकल घेऊन जातो आपल्या अंकित खूश होईल.त्या सायकलचे आणि अंकितचे स्वप्न साकार झाले.अशी ही मनस्वी बालकथा.जसे पुस्तक वही यांना कव्हर लावले तर पुस्तके खुश होतात.वस्तू कोणत्याही असो तिला ही जीव असतो.'हिरवं सपान'या कथेतील मंदार उन्हाळ्याच्या सुट्टीत गावी जातो.झाडं आणि शेती माती ही फक्त हिरवी देण्यासाठीच असतात."अरे, हिरवं सपान मातीच जन्माला घातले की, झाडं फुलं,झुडपं..ही सगळी मातीतूनचं जन्माला येतात की.मातीच हिरव्या सपनाची माय"(पृ.७४)या कथेत'झाडांचं सपान'असं शहराचं सपानं असावं.त्यालाही स्वप्न पडतं असतील ती शोधून काढा? अतिशय बोलकी कथा.शाळेच्या जीवनात सहल जाते.प्रत्येक विद्यार्थ्यांना जावे वाटते.पण आमच्या गाखेड्यात सहलीला पैसे नसल्यामुळे कधीचं जाता आले नाही.असेच एक चिमुकले मन मुक्त व्यक्त झाले आहे ते असे की आपण ही 'हाटू मुटूचा चंद्र' सहल करु शकतो.साक्षी आजीला एक हजार रुपये मागते सहलीला जाण्यासाठी.गरीबीनं आपल्या लेकराला नाहीना देऊ शकत पैसे.साक्षीला चिमणीचे उडणे आवडते शाळा,नासहल पैसा लागतो,ना अजून काही.तिचे वडील कोरोनात गेले.आई आणि आजीच कष्ट करून जगणं चालू आहे.मी आता सहलीला जाणारं नाही."बरोबर,ह्यो हटूमुटूचा चंद्र हाय.मंजी खोटा खोटा.पन आजचा ह्यो चंद्र उद्याचा खराखुरा चंद्र होनारं.आपून आपली चिकाटी न्हाय सोडायची.आगं,देव परीक्षा बगतू.आनी आपून पास झालू की,बक्षिशीपन देतू.आपून जराशीक कळ काढायची.सगळं मिळतं.तवा मनात कायबी नगं आणू.गरिबी आज हाय.उद्या हटल.पन मनातला हटूमुटूचा चंद्र कधी हरवू नगं"(पृ.६६)ही बालकथा अतिशय आशय संपन्न बालमनावर संस्कार शिदोरी देऊन जाते.आपण सतत आपल्या निसर्गातून व सभोवतालच्या घडलेल्या घटनेतून शिकत असतो.आपल्या बालसाहित्यांने एक निस्सीम प्रयोगशीलता फारूख काझी सरांनी दिली आहे.एक बालकांचे मानसशास्त्र सुप्त मनोज्ञ भाव त्यांच्या कथेचा आत्मा आहे.बालसाहित्याची भाषा ही सहज सोपी मुलांना आकलन सुलभता असल्याने ती वाचनीय होऊन जाते.फारुख काझी सर यांचे बालसाहित्य हे बालकांच्या कृतीउक्ती प्रवण करणारे असल्याने व बोलीभाषाचा सहज संवाद हे वैशिष्ट्य आहे.फारुख काझी मनोगत असे"मला नेहमी वाटलं की, वाचन हे केवळ वाचन म्हणून घडू नये.त्यातपण सृजनशीलता असली पाहिजे.नवीन(चांगल्या) विचारांची रचनात्मक बीज त्यात मना रुजली पाहिजेत.चांगला माणूस म्हणून घडण्याच्या प्रवासात वाचन महत्वाची भूमिका पार पाडत असतं.त्या प्रवासात पुस्तकं मार्गदर्शक मित्र म्हणून सोबत येतात "(पृ.५)एक सृजनशील अभ्यासक,अध्यापक व विद्यार्थी संस्कार भक्ती म्हणून ही साहित्य शिदोरी आहे.तर पाठराखण जेष्ठ साहित्यिक समीक्षक डॉ रणधीर शिंदे लिहितात "सांजचा वारा झेलत मुलं पठार उतरू लागतात.किंवा दुपार हळूहळू पाय पसरू लागली अशी धावती गद्यवलय फारूख काझी यांच्या लेखनात आहे.व्यंकटेश माडगुळकरांच्या माणदेशी कथेतील कोवळी निरागसता आणि करुणाभावाचा गाढ स्पर्श फारूखच्या कथेस आहे.या कथेतील ही हिरवी परिसरमाया चंद्रमोहन कुलकर्णी यांच्या रंगचित्रातून वाहती ठेवली आहे.या कथेतील अनागर परिसरातील मुलांच्या सामंजस्यसुरांत आणि परिसर निहाळीत अस्सल मराठमोळेपण आहे"(ब्लर्ब)असे हे अतिशय शिस्तहस्त लेखणीचा हा अतिशय मौलिक अधिष्ठान प्राप्त करून देणारा दहा बालकथांचासंग्रह यांतील अतिशय लक्षवेधी अतिल चित्ररेखन व मुखपृष्ठ चंद्रमोहन कुलकर्णी यांचे आहे.मनस्वी हार्दिक शुभेच्छा.

**पुस्तक:-हाटूमुटूचा चंद्र:-फारूख एस.काझी**
**प्रकाशक:-मेहता पब्लिकेशन हाऊस प्रा.लि.प्रकाशन:-सुनील अनील मेहता मुखपृष्ठ:-चंद्रमोहन कुलकर्णी,पुणे.प्रथमावृती:-मे.२०२६किंमत:-रू.२५०/**



**पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके, जालना**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २७ सप्टेंबर २०२६


# शिक्षण वाचवण्यासाठी शिक्षकांनी पुढे आले पाहिजे




क्षक दिनाच्या निमित्ताने माझे विद्यार्थी मला शुभेच्छा पाठवतात आणि आपण एकत्र काम करत, शिकत आणि घडत गेलेले ते सुंदर दिवस आठवतात, तेव्हा मला मनापासून आनंद होतो. त्याचबरोबर, अध्यापनाकडे पाहण्याची माझी दृष्टी घडवणाऱ्या अनेक महान शिक्षणतज्ज्ञांची मी कृतज्ञतेने आठवण करतो. यामध्ये सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे विद्वत्तापूर्ण कार्य आणि तत्त्वज्ञानविषयक अंतर्दृष्टी मला आठवते. सावित्रीबाई फुले यांचेही स्मरण होते—पितृसत्ताक आणि जातिव्यवस्थेने ग्रस्त अशा आपल्या समाजातील शोषित व वंचित लोकांमध्ये ज्ञानाची ज्योत पेटवण्यासाठी त्यांनी दाखवलेले धैर्य आणि केलेली निष्ठावान कामगिरी विसरता येणार नाही. माझ्या परीने मी पाउलो फ्रेरे आणि बेल हुक्स यांच्या विचारांशीही जोडला गेलो आहे. त्यांनी मांडलेल्या मुक्ततावादी शिक्षणाच्या संकल्पनेने आम्हाला प्रेरणा दिली. रवींद्रनाथ टागोर यांच्या A Poet's School या ललित निबंधातून, जिद्दू कृष्णमूर्ती यांच्या "स्कुल विदाउट फिअर" या पुस्तकातून आणि गिजुभाई बधेका यांच्या " दिवास्वप्न" या पुस्तकात मांडलेल्या त्यांच्या अद्भुत शैक्षणिक प्रयोगातूनही मला प्रेरणा मिळाली आहे. माझे भवितव्य सत्तेच्या आकर्षणाने नव्हे, तर शिकण्याचा, न शिकलेले पुन्हा शिकण्याचा आणि शिकवण्याचा आनंद यामुळे घडले, याचा मला आनंद आहे. परंतु या अस्थिर काळात एक प्रकारची चिंता मला सतावू लागली आहे. आपल्या शैक्षणिक संस्थांची होत असलेली घसरण आणि विद्यार्थ्यांच्या वेदना समोर दिसत असताना शिक्षक दिन साजरा करून खरोखर आनंद व्यक्त करता येईल का? मी स्वतःलाच विचारतो की, या दिवसाचा उत्सव साजरा करण्याचे काही कारण आजही उरले आहे का? विद्यार्थ्यांच्या वाढत्या तणावाचा प्रश्न आजच्या या अस्वस्थ पिढीच्या व्यथेबद्दल विचार करा. विद्यार्थी आपल्या भविष्याबद्दल अनिश्चित आहेत; त्यांच्यावर ताण आहे आणि ते चिंतेने ग्रासलेले आहेत. एखादा विद्यार्थी अत्यंत सुखसोयी असलेल्या प्रतिष्ठित संस्थेत शिकत असो किंवा छोट्या शहरातून येऊन NEET सारख्या अत्यंत स्पर्धात्मक परीक्षेची तयारी करत असो. या पिढीवर असलेला ताण निश्चितच चिंताजनक आह हा लेख लिहित असताना आयआयटी दिल्ली येथे एका एमएससी विद्यार्थ्याने आत्महत्या केल्यानंतर परिस्थिती तणावपूर्ण आहे. या दुःखद घटनेला प्रशासनाने दिलेला थंड आणि नोकरशाही पद्धतीचा प्रतिसादही अस्वस्थ करणारा आहे. त्याचप्रमाणे NEET परीक्षा रद्द होणे आणि पुन्हा नियोजित होणे तसेच प्रश्नपत्रिका फुटण्याच्या मोठ्या वादानंतर अनेक विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याचे लक्षात येते, तेव्हा मन हेलावून जाते. राष्ट्रीय गुन्हे नोंद ब्युरोने दिलेल्या आकडेवारीकडे पाहिल्यावर परिस्थितीचे गांभीर्य आणखी स्पष्ट होते. २०२४ मध्ये विद्यार्थ्यांच्या आत्महत्येची १४,४८८ प्रकरणे नोंदली गेली. अत्यंत विषम आणि असमान समाजात सामाजिक-आर्थिकदृष्ट्यावर जाण्याच्या शर्यतीने विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यावर किती गंभीर परिणाम केला आहे, हे यातून लक्षात येते. शिक्षणाचे कोचिंगमध्ये रूपांतर आपल्या शाळा आणि विद्यापीठांची अवस्था अत्यंत दयनीय होत चालली आहे. एकीकडे आकर्षक नावांच्या इंग्रजी माध्यमाच्या आणि खासगी शाळा अगदी अपरिचित गावांमध्ये व छोट्या शहरांमध्येही दिसतात; दुसरीकडे सरकारी शाळांची अवस्था अत्यंत खराब आहे. नीती आयोगाच्या अलीकडील अहवालानुसार, एका दशकात ९४,००० सरकारी शाळा बंद झाल्या आहेत. त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे, शिक्षण क्षेत्राचे ज्या पद्धतीने व्यापारीकरण आणि अवमूल्यन होत आहे, त्याकडे पाहिले पाहिजे. अन्यथा सरकारी शाळांमधील शिक्षकांना वर्ग सोडून निवडणुकीचे काम, जनगणना, मतदार यादीतील दुरुस्ती आणि इतर प्रशासकीय स्वरूपाची गैरशैक्षणिक कामे करण्यास वारंवार का सांगितले जाते? याशिवाय, शिकवण्याची इच्छा असलेल्या शिक्षकांचे मनोबल खच्ची करणारी एक व्यवस्था निर्माण झाली आहे. 'यशाची सूत्रे' सांगणारे कोचिंगचे व्यापारी भौतिकशास्त्र, गणित, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र कसे शिकवायचे हे ठरवतात, तेव्हा खोलवर आणि अर्थपूर्ण पद्धतीने शिकवू इच्छिणाऱ्या शिक्षकांसाठी जागा उरते तरी कुठे? 'डमी स्कूल' आणि कोचिंग संस्कृती आपण 'डमी स्कूल'च्या सामान्यीकरणाचा आणि भारतातील सुमारे ५८,००० कोटी रुपयांच्या कोचिंग उद्योगाचा शाळांच्या दयनीय अवस्थेशी असलेला संबंधही गांभीर्याने तपासला पाहिजे. आज शिक्षणाचा अर्थ विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाऐवजी केवळ NEET आणि JEE सारख्या परीक्षांसाठी प्रशिक्षण असा केला जात आहे. या परिस्थितीत तरुणांच्या मनाचा विकास, त्यांच्या चिकित्सक विचारशक्तीला धार देणे आणि त्यांच्यात खऱ्या अर्थाने लोकशाही वृत्ती विकसित करणे यासाठी शिक्षणाची भूमिका कुठे उरते? शिक्षणाचे व्यापारीकरण आणि लोकशाही मला स्पष्टपणे सांगावेसे वाटते की, कोचिंग माफियाने शिक्षण क्षेत्रावर केलेल्या अतिक्रमणाचा उत्सव साजरा करण्यासाठी 'शिक्षक दिन' हा दिवस नाही. जेव्हा आपल्या विद्यापीठांमध्ये शैक्षणिक स्वातंत्र्य नाकारले जाते, भीतीचे आणि देखरेखीचे वातावरण निर्माण होते आणि त्यामुळे विचार, चर्चा, वादविवाद व मतभेदांचा मुक्त प्रवाहच खंडित होतो, तेव्हा शिक्षक दिनाचा अर्थच हरवून बसतो. शिक्षणाचा अर्थ जर नवउदारमतवादी विचारसरणीच्या प्रभावाखाली केवळ उद्योगांना आवश्यक असलेल्या नोकरीच्या प्रशिक्षणापुरता किंवा तांत्रिक कौशल्ये विकसित करण्यापुरता मर्यादित केला, तर आपण उदारमतवादी आणि मानवतावादी शिक्षणाच्या मूलभूत भावनेलाच गंभीर धक्का देत आहोत. अशा प्रकारचे साधनवादी शिक्षण लोकशाहीच्या आत्म्यालाच कमजोर करते. जर प्रत्येक गोष्टीचे मूल्य तिच्या आर्थिक किंवा बाजारमूल्याच्या आधारे ठरवण्यास सांगितले जात असेल, तर आपण विद्यार्थ्यांना चिकित्सक विचार, स्त्री-अभ्यास आणि वंचित/दलित समूहांचा इतिहास कसा शिकवणार? अतिराष्ट्रवादाचे संकट आजच्या विषारी वातावरणात अतिराष्ट्रवादाचा अजेंडा सामान्य होत चालला आहे. अशा परिस्थितीत चिकित्सक शिक्षणशास्त्राची भावना टिकून राहणे कठीण आहे. लष्करवाद, सामाजिक पुराणमतवाद, बहुसंख्याकवाद आणि अल्पसंख्याकांना सतत 'परके' ठरवण्याची प्रवृत्ती, अतिराष्ट्रवादाच्या चर्चेने या सगळ्यांना जणू सामान्य स्वरूप दिले आहे. अशा परिस्थितीत शिक्षकांनी अतिराष्ट्रवादाच्या या विचारसरणीला प्रश्न विचारणे शक्य होईल का? शिक्षकांनी आता आवाज उठवला पाहिजे या संकटाच्या काळातही एक गोष्ट आशादायक आहे. आपले विद्यार्थी स्वतःचा आवाज उठवत आहेत. ते विविध प्रकारचे धोके पत्करून शिक्षणावर होत असलेल्या या सततच्या आक्रमणाविरोधात आंदोलन करत आहेत. आपण शिक्षक म्हणूनही या परिस्थितीचा गंभीरपणे विचार केला पाहिजे. आपण पुढे आलो नाही, आपला आवाज उठवला नाही आणि शिक्षण वाचवण्यासाठी चळवळ उभी केली नाही, तर शिक्षक दिनाच्या निमित्ताने स्वतःचे अभिनंदन करून आनंद व्यक्त करण्याचे खरोखर कोणते कारण उरते? शिक्षण वाचवण्यासाठी शिक्षकांनीच आता पुढे येणे आवश्यक आहे.

***लेखक : अविजित पाठक हे समाजशास्त्राचे सेवानिवृत्त प्राध्यापक, जे. एन. यू. नवी दिल्ली.***
***मराठी अनुवाद : प्रा. प्रियदर्शन भवरे, बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना***

# समृद्धी महामार्गावर भीषण अपघात; XUV कंटेनरला धडकली, दाम्पत्यासह चिमुकल्याचा मृत्यू



**दौलताबाद (जावेद अहमद) :** समृद्धी महामार्गांवर दौलताबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीत चैनल क्रमांक ४४९.५ जवळ शुक्रवारी (दि. २६) दुपारी भीषण अपघात झाला. समोरून जाणाऱ्या कंटेनरला पाठीमागून भरधाव XUV कारने जोरदार धडक दिल्याने कारमधील दाम्पत्यासह अंदाजे तीन वर्षांच्या चिमुकल्याचा जागीच मृत्यू झाला. या अपघातात कारचा अक्षरशः चक्काचूर झाला. अपघातानंतर महामार्ग सुरक्षा पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेत कारमध्ये अडकलेल्या तिन्ही मृतदेहांना बाहेर काढले मिळालेल्या माहितीनुसार, GJ 21 Y 3362 क्रमांकाचा कंटेनर सुरतहून सेलमकडे जात होता. या कंटेनरचा चालक संगप्पा यमगर (वय ३२) हा वाहन चालवत होता. दरम्यान, MH 12 YS 1028 क्रमांकाची XUV कार नाशिकहून जालन्याकडे जात होती. चैनल क्रमांक ४४९.५ जवळ XUV चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. तसेच चालकाला झोप लागल्याने समोरून जाणाऱ्या कंटेनरला XUVने पाठीमागून जोरदार धडक दिल्याची प्राथमिक माहिती आहे धडक इतकी भीषण होती की XUVमधील प्रवासी वाहनात अडकून पडले होते अपघाताची माहिती मिळताच महामार्ग नियंत्रण कक्षाच्या सूचनेनुसार सुरक्षा पर्यवेक्षक कृष्णा बडे यांच्यासह सुरक्षा पथक अवघ्या पाच मिनिटांत घटनास्थळी पोहोचले. त्यांनी तातडीने बॅरिकेडिंग करून वाहतूक सुरळीत केली. त्यानंतर QRV पथकाच्या मदतीने वाहनात अडकलेल्या व्यक्तींना बाहेर काढण्यात आले या अपघातात XUV चालक मृतांमध्ये प्रतीक रामकिसन जगदाळे (वय ३१),प्रिया प्रतीक जगदाळे (वय ३२),रुद्रांश प्रतीक जगदाळे(वय २) राहणार लालरेजा नगर,पिंपळा बंगला,जालना हल्ली मुक्काम फ्लॅट नंबर १३०५, टॉवर नंबर १,एस,न ४४/१/१ सिमेंट ए विंग मुळशी,पुणे यांचा जागीच मृत्यू झालातिन्ही मृतदेह महामार्ग रुग्णवाहिकेने घाटी रुग्णालयात पाठविण्यात आले अपघाताची माहिती मिळताच महामार्ग सुरक्षा पोलिसांचे अधिकारी व दौलताबाद पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन खंडागळें व कर्मचारीघटनास्थळी भेट दिलीया घटनेची नोंद दौलताबाद पोलीस स्टेशनमध्ये करण्यात आली असून पुढील तपास पोलीस अंमलदार विठ्ठल खंडागळे हे करत आहे

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २७ सप्टेंबर २०२६


# ३. शोध मोहिम... (८६७)

## अबोलप्रीती
एक अनवट प्रेमकथा...

दुसऱ्या दिवशी समीर सकाळीच लवकर उठून त्याने घरातील एक छोटी लाकडी सन्दुक रिकामी केली. आईकडून थोडे पैसे घेतले, त्या पैशांतून त्याने भाग्यनगरच्या बाजारातून वेगवेगळ्या कारागीरांकडून महिलांचे उपयोगी असे सर्व साहित्य घेतले सन्दुकमध्ये भरले. ती सन्दुक डोक्यावर घेऊन निघाला सारसनगरच्या दिशेने.

असे बरेच दिवस तो सारसनगर आणि आजूबाजूच्या नगरात सामान विकत होता. त्याच्या लक्षात आले की महिलांना वेगवेगळ्या प्रकारच्या बांगड्या खूप आवडतात. मग तो भाग्यनगरच्या कारागीराकडून महिलांना जश्या प्रकारच्या बांगड्या आवडतात अगदी तश्याच बनवून घेऊ लागला, बघता बघता त्याच्या बांगड्या खूप खपू लागल्या. तो रोज एका वारी एका नगरात जाऊ लागला.

एकदा तो सारसरनगरच्या राजवाड्याजवळून जात होता. त्या वाड्याची भक्कम चिरेबन्द तटबन्दी पाहून तो अवाकच झाला. ती तटबन्दी खूपच लाम्बपर्यंत होती. जर त्या राजवाड्याला प्रदक्षिणा घालायची म्हटले तर पायाचे अक्षरशः तुकडे पडतील एवढा मोठा तो प्रासाद. त्या प्रसादाच्या मुख्य प्रवेशद्वारातून काही माणसे आत-बाहेर येत जात होती. समीरने विचार केला आपणही आत जाऊन आपल्या बांगड्या विकाव्यात. त्या भव्य उंचच उंच व लाकडी प्रवेशद्वाराजवळ तो गेला आणि दिंडी दरवाजातून आत जाण्यासाठी पुढे सरसावला, तोच द्वारपालाने त्याला अडविले व विचारले, "ए मुला... काय काम आहे रे तुझं... ? अगदी तरातरा आत घुसतोयस...?" "काही नाही.... काही काम नाही... या बांगड्या माझ्याकडे आहेत, खुप सुन्दर, आकर्षक, नक्षीच्या बांगड्या आहेत. आत जाऊन कोणाला हव्या आहेत का ते विचारून बघतो..." - समीर. "हॉ... चल हो मागे.... हा काय तुझ्या गावचा आठवडी बाजार वाटला काय, आत जाऊन बांगड्या विकायला... चल हाकल इथून या वाड्याच्या आसपासही दिसू नकोस..." असे म्हणत त्या द्वारापालाने हातातील भाल्याचे टोक त्याच्या अगदी नाकासमोरच धरले.

समीरची तर अगदी घाबरगुण्डीच उडाली. तो ज्या वेगाने पुढे आला होता त्याच्या दुप्पट वेगाने मागे सरकला आणि मागे वळून जी धूम ठोकली ती अगदी लाम्ब जाऊनच थांबला. त्याला वाटले, 'बरे झाले, तो भाला नाकासमोर येऊन थांबला, थोडा जरी पुढे आला असता तर प्राणाशी गाठ. आता त्या वाड्याच्या जवळपासही नको. जीव आहे तर सगळे आहे." असेच एक दिवस सारसनगरच्या रस्त्यांवरून समीर आरोळी देत फिरत होता... "बांगडीवाले.... कोणाला बांगडी हवी आहे आहे, छान नक्षीदार बांगडी...."

रजनीने तिच्या घराच्या खिडकीतून समीरच्या हातातील तो दाखवत असलेल्या बांगड्या पाहिल्या, तिला वेगळ्या वाटल्या. तिने लगेच आवाज दिला, "ए बांगडीवाल्या, पुढच्या दारातून आत वाड्याच्या चौकात ये." लगेच समीर वाड्यात शिरायला लागला तर द्वारपालाने अडविले, पण एवढ्यात रजनी माडीवरून चौकात खाली आली. तिने द्वारपालाला आत सोडायला सांगितले.

"माझ्याकडे खुप सुन्दर, नक्षीदार आकर्षक बांगड्या आहेत, दाखवतो. पण आधी तुझ्या हाताचे माप मला दे."

रजनीने हातातली बांगडी काढून दिली त्या मापाच्या बऱ्याच आकर्षक बांगड्या दाखविल्या. तिने दोन प्रकारच्या छान नक्षीदार, एक एक डझन बांगड्या घेतल्या. पण नेहमीप्रमाणे येथेही समीरच्या पदरी निराशाच आली. ज्या मुलीने त्याला बोलाविले बांगड्याही घेतल्या तिचे केस काही लाल नव्हते, काळेच होते. पण ना उमेद न होता, समीर आपले बांगड्या विकण्याचे काम करीतच राहिला.दुसरे दिवशी रजनी जेव्हा सुगन्धाकडे गेली, तेव्हा सुगन्धाला तिच्या हातातल्या नविन बांगड्या खूप आवडल्या. रजनी म्हणाली "मी दोन वेगवेगळ्या नक्षीच्या बांगड्या कालच घेतल्या. उद्या मी दुसऱ्या बांगड्या घालून येईन." दुसरे दिवशी रजनीने वेगळ्या बांगड्या घातल्या त्याही सुगन्धाला खुपच आवडल्या. सुगन्धा रजनीस म्हणाली, "कुठून घेतल्या एवढ्या सुन्दर बांगड्या, आपल्या सारसनगरमध्ये तर अशा बांगड्या मिळत नाहीत... ?" रजनी म्हणाली, "अगं, एक मुलगा आहे... तो रस्त्यावर फिरत फिरत बांगडी विकताना कधी कधी दिसतो. त्याच्याकडून मी घेतल्या."

"अस्सं... मग मलाही घ्यायच्या आहेत त्याच्याकडून अगदी अश्शाच छान नक्षीच्या. कधी येईल तो परत... ?" - सुगन्धा. "काही सांगता येत नाही. पण मी लक्ष ठेवते आणि त्याला घेवूनच येते." रजनी सारसनगरच्या एका द्वारपालाला जाऊन भेटली. त्याला सांगितले की, 'जेव्हा केव्हा तो बांगडीवाला मुलगा परत येईल, त्याला लगेच माझ्या आवासात पाठवून द्या.' मग त्या द्वारपालाने नगराच्या सर्वच प्रवेशद्वारावरील सर्व द्वारपालांना सुचना पाठवून दिली. दोन-तीन दिवस असेच निघून गेले. समीर नेहमीसारखा त्याच्या ठरलेल्या वारी सारसनगरला आला. तो दिसताच द्वारपालाने त्याला लगेच हटकले,

"ए बांगडीवाल्या... कुणाच्या लग्नाला चाललास अगदी तोण्ड वर करून... ऑऽऽऽ" "कुणाच्या नाही... मी तर बांगडी विकायला आलो आहे, नेहमी येत असतो, मागच्या आठवड्यातही आलो होतो... या विकलेल्या बांगड्यावरची मालगुजारी, जकातही मी भरतो..." समीर घाबरत घाबरत द्वारपालाशी बोलत होता. त्याला त्याचा एकुण रागरंग काही वेगळाच दिसत होता. इतर वेळी अडविले नाही मग आत्ताच का ? "चल इकडे या बाजूला ये... तुझी सन्दुक उघडून दाखव..." - द्वारपाल.

त्याच्या सन्दुकची तपासणी करून झाल्यावर द्वारपालाने लगेच जवळच उभ्या असलेल्या शिपायाला हाक मारली. "ए मकरध्वज... याला लगेच त्या रजनीच्या आवासात घेऊन जा. तिने याला बोलाविले आहे..." हे ऐकल्यावर समीरचा तेव्हा कुठे जीव भाण्ड्यात पडला. त्याला वाटले की आपल्याला पकडून राजापुढे उभे करतात की काय... म्हणजे आपल्याला कोणीतरी रजनीने बांगड्या घेण्यासाठी बोलावले आहे, पाहूया तिचे केस लाल आहेत की काळे... असा विचार करत करत तो मकरध्वजच्या मागे मागे जात होता. मकरध्वज एक वाड्याजवळ येऊन थांबला, तेव्हा समीरच्या लक्षात आले की या वाड्यातील मुलीने मागच्याच आठवड्यात बांगड्या घेतल्या आहेत. म्हणजे हिचे नांव रजनी. वाड्यात प्रवेश करताच रजनी माडीवरून खाली आली आणि मकरध्वज निघून गेला. "अरे बांगडीवाल्या तुझ्याकडून मागच्या आठवड्यात मी बांगड्या घेतल्या होत्या. त्या आमच्या राजकुमारीला फारच आवडल्या. तिलाही तशाच बांगड्या हव्या आहेत. आहेत का तुझ्याकडे ... ?" - रजनी. "हो आहेत आणि जर राजकुमारीला हव्या असतील तर मी पुढच्या आठवड्यात आणखी वेगवेगळ्या प्रकारच्या चांगल्या, नविन नक्षीच्या आणि सुबक बांगड्या विशेषकरून बनवून घेऊन येईन. कारण राजकुमारीला बांगड्या हव्या आहेत, मग त्या चांगल्याच असायला हव्यात..." - समीर. "ठीक आहेत तर मग... पुढच्या आठवड्यात बांगड्या घेऊन ये. पण लवकरच ये... अगदी सूर्योदयानंतर पहिल्या प्रहरालाच तू इथे उपस्थित असला पाहिजे..." - रजनी. "हो हो... मी अगदी वेळेवर येईन... पण राजकुमारीच्या बांगडीचे माप मला हवे आहे." - समीर.

"ही घे माझी बांगडी. माझे आणि तिचे माप सारखेच आहे." - रजनी.

आज का कोण जाणे पण समीरला त्याचा आतला आवाज सांगत होता, की ती लाल केसवाली जी कोणी आहे तीला लवकरच आपण भेटणार आहोत असा आशेचा किरण त्याला कुठेतरी दिसत होता. (क्रमशः)




**नाव : अनिकेत भालेराव.**
**पत्ता : १२, वासुदेवानंद, ६५१, नारायण पेठ, पुणे ४११ ०३०.**
**विद्युत पत्र : aniket.bhalerao@rocketmail.com**
**भ्रमणध्वनी : ९४२२५०४६०८**


# बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन उत्साहात संपन्न; विविध स्पर्धांसह आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन



**जालना** : येथील बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना (रासेयो) स्थापना दिनाचे औचित्य साधून विविध स्पर्धा, प्रबोधनात्मक कार्यशाळा तसेच आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले. या निमित्ताने विद्यार्थ्यांमधील सामाजिक जाणिवा व सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी निबंध व पोस्टर स्पर्धा घेण्यात आल्या. 'राष्ट्रीय सेवा योजना आणि युवक', 'युवक आणि समाजसेवा', 'राष्ट्रीय सेवा योजना: समाज परिवर्तनाचे माध्यम' आणि 'श्रमदान व समाज विकास' अशा विविध महत्त्वपूर्ण विषयांवर निबंध स्पर्धा पार पडली. निबंध स्पर्धा: प्रथम क्रमांक: भाग्यश्री वाघमारे, द्वितीय क्रमांक: गौरी पवार, तृतीय क्रमांक: अनुष्का इंगळे. पोस्टर स्पर्धा: प्रथम क्रमांक: वैष्णवी जायभाये, द्वितीय क्रमांक: भाग्यश्री वाघमारे एड्स जनजागृती व संवेदन कार्यशाळा: महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था (मुंबई) आणि जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष, जिल्हा सामान्य रुग्णालय, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी संवेदन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक व समुपदेशक म्हणून श्री. सुनील घनसावंत उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना एड्स म्हणजे काय, त्याची कारणे, लक्षणे आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना याविषयी सविस्तर व शास्त्रीय माहिती दिली. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांकडून प्रश्नावली भरून घेऊन त्यांचे प्रबोधन करण्यात आले. प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी या संवादात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. आरोग्य तपासणी शिबिर: याच कार्यक्रमात महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी रक्तदाब (बीपी) व ब्लड शुगर तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयातील आरोग्य पथकाचे श्री. अरुण पटोले, श्वेता पिल्ली आणि पूजा हिवरे यांनी कर्मचाऱ्यांची तपासणी केली. यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. भूषण नाफडे, रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. ओमप्रकाश चव्हाण, प्रा. रामेश्वर मस्के यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कांचन कायंदे यांनी तर उपस्थितांचे आभार प्रा. स्वाती पुरी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी शिवाजी वायाळ, सुंदर वायाळ, भीमराव मोरे यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.